**<u>नि.दि.दा.क्र.४३/२०१९, अर्ज निशाणी ११९ खालील आदेश</u>**

<u>(CNRNO.MHSI090001972019)</u>

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी प्रतिवादी क्र.२४ राखी शांताराम आलव या दि.१३/०९/२०२२ रोजी मयत झाली असून त्यांना प्रतिवादी क्र.२६ हे कायदेशीर वारस आहेत व ते यापूर्वीच रेकॉर्डवर असल्याने व प्रतिवादी क्र.२४ विरुध्द प्रस्तूत दावा अवसान पावलेला नसल्याने प्रतिवादी क्र.२४ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यास प्रतिवादीने आक्षेप नोंदवला.

०३. अर्ज व जबाब तसेच उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, वादीच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.२४ या दि.१३/०९/२०२२ रोजी मरण पावल्या आहेत. प्रस्तूतचा दावा हा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. मयत प्रतिवादी क्र.२४ यांचे वारस प्रतिवादी क्र.२६ हे दाव्यात यापूर्वी समाविष्ट आहेत. प्रस्तूत दाव्याचे स्वरुप लक्षात घेता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता खालील आदेश.

**– <u>आदेश</u> –**

१. नि.क्र.११९ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.11.17 10:49:26 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )

दिनांकः १६/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.